भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०४/२०१८

**१) भांडण करून हातावर चाकुने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनाक १०/०४/२०१८ चे ०८.०० दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादी हिचा पती असुन फिर्यादीस तु माझे घरी राहु नकोस कुठेही निघुन जा असे म्हणुन भांडण करून फिर्यादीचे उजवे हातावर चाकुने मारून जखमी केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) भांडण करून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक १०/०४/२०१८ चे ०६.०० दरम्यान यातील जखमी फिर्यादीचे शेनखतावर आरोपीच्या कोंबडया खत ईखरत होत्या म्हणुन जखमीने कोंबडयाना हाकलले असता, यातील आरोपीने तु माझ्या कोंबडयाना का हाकलला या कारणा वरून भांडण करून काठीने जखमीचे डोक्यावर, डावे हाताचे पंज्यावर मारून जखमी केल्याने जखमी फिर्यादी जनार्धन हरी बांगळकर वय ५० वर्ष रा. ओपारा यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**३) भांडण करून लोखंडी किकरा कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक १०/०४/२०१८ चे १०.०० दरम्यान यातील फिर्यादी हा आरोपीच्या घरी सुतार कामाचे साहित्य घेण्यास गेला असता, यातील आरोपीने सुतार कामाचे साहीत्य देण्यास नकार देवुन 'तु माझे कामावर का आला नाही' असे म्हणुन फिर्यादी सोबत भांडण व शिवीगाळ करून बाजुला ठेवलेला लोंखडी किकरा उचलुन फिर्यादीचे कपाळावर मारून जखमी केल्याने, फिर्यादी राजेन्द्र प्रभु सुर्यवंशी वय ३२ वर्ष रा. हणुमान वार्ड पेट्रोलपंप ठाणा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणा वरून लोखंडी विळयाच्या मुठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिंनाक ०७/०४/२०१८ चे १७.३० दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन आरोपी हा दारू पाणी पिवुन घरी आला व कोंबडयाना दाना का टाकले नाही, असे बोलुन लोखंडी विळयाच्या मुठीने उजवे हातावर डोक्यावर, व पाठीवर मारून जखमी केल्याने, फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**५) ट्रकच्या धडकेने एक गंभिर जखमी :–**

दिंनाक ०९/०४/२०१८ चे ०६.४५ दरम्यान यातील जखमी नामे राजीव मनीराम रामटके वय २२ वर्ष रा. इंदुरखा हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ४९ सी ९१११ ने भंडारा येथुन गावी परत येत असता इंदुरखा कडुन लावेश्वर कडे गिट्टी घेवुन जाणा–या यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक दुस–याचे जिवीतास धोका पोहचेल अशा रितीने भरधाव वेगाने व हयगयीने चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक मारून सचीन यास गंभिर जखमी करून ट्रक घेवुन पडुन गेल्याने फिर्यादी कृष्णा सोमाजी मारवाडे वय ३५ वर्ष रा. इंदुरखा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४,१३४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. कासदा पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**६) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०४/२०१८ चे १९.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही करचखेडा फाटा येथे दारूचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने, त्याचे ब्रिथ अल्कोहाल ॲनालायझर मिशन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. गायधने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना.गायधने पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/०४/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोर वाहन अडयाळ बसस्थानक येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बोरकर पोलीस स्टेशन अडयाळ करीत आहेत.

**८) इसमाचा मृत्यु:–**

दिंनाक १०/०४/२०१८ चे १३. ४५ वाजता दरम्यान यातील मृतक परीस गणेश साठवणे वय २३ वर्ष रा. जाम हा फिर्यादी सोबत ईलेक्ट्रीक पोलवर चढुन ट्रान्सफर्मिरचे काम करीत असतांना अचानक खाली पडल्याने, त्यास औषधोपचारा करीता जखमी अवस्थेत प्राथमीक आरोग्य केंद्र जाम येथे भरती केले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी गणेश श्रीराम गोलकुरे वय २८ वर्ष रा. जाम यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव करीत आहेत

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १०/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०८ तीन सिटर वाहनाकरीता– ०५ ईतर वाहनांवरती – ११२ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.